# मोदीज् वर्ल्ड

## विस्तारमान भारताच्या परिणामाची व्याप्ती

**सी. राजा मोहन**

अनुवाद

**इंद्रायणी सावकार**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Modi's World : C. Raja Mohan
Marathi translation by Indrayani Savkar
First published in Marathi by Riya Publications
By arrangement with HarperCollins Publishers India Limited
Copyright © The Indian Express Limited 2015

**मोदीज् वर्ल्ड :** सी. राजा मोहन

अनुवाद : इंद्रायणी सावकार

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
इंद्रायणी सावकार
इ-१००१-५ मंत्री एलिगन्स,
एम. एस. पाल्या, बेंगलोर- ५६००७६
मो. नं. : ०९३२३८७४२२१, ०८०४१५७२९८१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २६०/-

# अनुवादकाचे मनोगत

'रिया पब्लिकेशन्स्'चे श्री. शितल मेहतांनी मराठीतून भाषांतर करण्यासाठी अनेक पुस्तके सुचवली. पैकी मी 'मोदीज् वर्ल्ड' हे पुस्तक स्वीकारले. ते कठीण असणार याची मला कल्पना होती. नेहमीची नाजूक साजूक मराठी कशाला लिहायची? एकदा तरी भारदस्त, वजनदार व कठीण मराठी लिहूया अशा मानसिकतेने मी हे पुस्तक स्वीकारले. दुसऱ्याच दिवशी शितल मेहतांनी मला ते कुरियरने पाठवून दिले. वाचायला घेतले पण लगेच गाडे अडले शीर्षकापाशीच Modi's World हे शीर्षक आणि Expanding India's sphere of Influence हे उपशीर्षक. सामान्यत: उपशीर्षक पुस्तकाच्या तळाशी असते. पण प्रस्तुत शीर्षक प्रमुख शीर्षकाच्या पोटात छापले आहे! Expanding हे क्रियापद 'विस्तार करताना' असा त्याचा अर्थ; पण त्यामुळे मराठी उपशीर्षक फारच ओबडधोबड होऊ लागले. 'भारताच्या परिणामांची व्याप्ती विस्तारताना' असे काहीसे विचित्र! पण थोड्या वेळाने डोक्यात प्रकाश पडला Expanding हे क्रियापद नसून 'भारत'चे विशेषण आहे. ज्याला विस्तार मिळाला आहे असा म्हणजे विस्तारमान. 'श्री' मिळालेला श्रीमान, बुद्धी असलेला बुद्धिमान त्याच पठडीतला हा शब्द आहे– 'विस्तारमान.' आता नीटस व समर्पक उपशीर्षक तयार झाले. 'विस्तारमान भारताच्या परिणामाची व्याप्ती हे शीर्षक ऐकताच काही मैत्रिणी डोके धरून बसल्या तर काही छू झाल्या; पण नंतर कुतूहल जागृत होऊन परत आल्या. वजनदार विषयही वाचकांना आकृष्ट करतात. वाचनाचा वेग थोडासा संथ असतो पण आनंद तेवढाच. कदाचित जास्तच.

'मोदीज् वर्ल्ड' म्हणजे मोदींचे वैयक्तिक जग, आचार, विचार, भावविश्व, मानसिकता हे नव्हे; मोदींचे जग म्हणजे मोदी पंतप्रधान झाले त्या वेळचे जग, जागतिक परिस्थिती, इतर देश या पुस्तकाचे लेखक श्री. राजा मोहन प्रख्यात पत्रकार आहेत. परदेशासंबंधीच्या विषयाचे ते तज्ज्ञ आहेत. इंडियन एक्स्प्रेसमध्ये

त्यांनी लिहिलेल्या स्तंभांतून त्यांनी हे पुस्तक निर्मिले आहे. मोदींचे जग व विशेष करून मोदींचे परराष्ट्रविषयक धोरण हा या पुस्तकाचा विषय आहे.

मात्र... मात्र मोहन यांची भाषा सामान्य वाचकासाठी आहेसे दिसत नाही. ऑक्स्फर्ड विद्यापीठातून इंग्रजी भाषेत ज्यांनी प्रबंध लिहिला आहे त्यांच्यासाठी मोहननी लिखाण केले आहे. हे रास्तच आहे. भारदस्त विषयाला जुळेल अशीच शैली हवी; पण एकेक वाक्य अगडबंब एका वाक्यातून दुसरे, दुसऱ्यातून तिसरे अशी आगगाडी. मराठीला हा ढाचा कसा काय झेपेल? लागलीच शितल मेहतांना फोन लावला.

''या पुस्तकातली वाक्यं फार लांबलचक आहेत. त्यांच्यातून छोटी छोटी वाक्यं जमवली तर चालेल काय?''

''नुसतं चालणार नाही तर ते आवश्यक आहे. नाहीतर वाचकांना अर्थबोध होणार नाही.''

आनंदी आनंद!

भाषांतर एकदाचे सुरू झाले. मराठीतून इंग्रजी हा शब्दकोश मी वापरीत नाही. मराठी भाषा समृद्ध नाही असा एक समज आहे तो तद्दन चुकीचा आहे. मराठीपेक्षा इंग्रजीचा शब्दसंग्रह मोठा आहे. दर महिन्याला इंग्रजी भाषेत ५००० नवीन शब्दांची भर पडते असं म्हणतात. हे वैभव मराठीकडे नाही पण मराठीकडे अनेक सुंदर सुंदर वाक्प्रचार आहेत. ते इंग्रजीकडे नाहीत. शिवाय मराठीची 'माय' संस्कृतभाषा ही म्हणजे शब्दांची नाणी पाडण्याची टाकसाळ. तेव्हा कितीही कठीण इंग्रजी असो त्याला एक समर्पक मराठी शब्द सापडणारच आणि काय सांगू? विषय रंगत चालला. हे पुस्तक इतके रंगेल अशी माझी बिलकूल कल्पना नव्हती. 'एक रुक्ष राजकीय विषय.' केवळ एक वेगळ्या प्रकारची मराठी– काहीशी अवघड व भारदस्त मराठी माझ्या लेखणीतून उतरावी या एकाच उद्देशाने हे पुस्तकी मागवले होते; परंतु या पुस्तकाने म्हणजे राजा मोहननी अर्थात एक 'कमाल की चीज हासील केली'– कादंबरीतली पात्रे आपल्या घरात येतात आणि मनात कायमचं घर करून बसतात तसे मोहननी आपल्या देशाच्या बाबतीत घडवले. 'भारत' एक व्यक्तीरेखा होऊन आपल्या मनात येतो. हा चमत्कार या पुस्तकामुळे घडला. या पुस्तकात एक कहाणी आहे व तिचा कथानायक भारत

आहे, मोदी नव्हेत. आपण या देशात जन्मलो आणि वाढलो; पण तो देश एका व्यक्तीरेखेचे रूप घेऊन आपल्या मनात संचारला नाही. दूर राहिला. कारण 'वृत्तपत्र दररोज सकाळी जन्म घेते व संध्याकाळी मरण पावते' असे असताना भारत आपल्या मनाची पकड घेईलच कसा? वाचक हो! भारताने तुमच्याही मनात एक स्थान मिळवावे. हे पुस्तक नक्कीच हे एवढे साध्य करील. पुस्तकात मोदींनाही चांगली सज्जड भूमिका आहे खरी; पण मंचावर अग्रभागी गायकाच्या स्थानी हातात माईक धरून उभा आहे भारत. शेजारी मोदी आहेत आणि मागे भलामोठा वाद्यवृंद आहे. मनमोहन सिंग, ममता बॅनर्जी, चीन, अमेरिका, पाकिस्तान, बंगालचा उपसागर आणखीही अनेक वाद्यकांचा; यांच्यामुळे हे पुस्तक विशेष शोभिवंत झाले आहे. अनेक कोपऱ्यात कॅमेरे बसवून मोहननी भारताचे चित्रण केले आहे आणि आपल्याला सादर केले आहे. यात भारताचा इतिहास, वर्तमानकाळ व भविष्य सारे काही आहे.

कादंबरी आपण एका दमात वाचून काढू शकतो. अनेकदा काढतोही. 'मोदीज् वर्ल्ड' हे अशा पट्टीतले पुस्तक नाही. ते चवीचवीने थोडेथोडे वाचायचे आहे. समजून घ्यायचे आहे. आणि राजा मोहननी आपला भारत आपल्या घरात पोहोचवला याबद्दल त्यांचे मनोमन आभार मानायचे आहेत. प्रस्तुत भाषांतराच्या बाबतीत, म्हणजेच अर्थात् संपूर्ण पुस्तकाच्या बाबतीत प्रभाकरची मला कल्पनातीत मदत झाली. याचा आवर्जून उल्लेख मला केला पाहिजे. वृत्तपत्रीय मराठीत अनेक तांत्रिक शब्द आहेत. हे शब्द सामान्य तया मराठीतही आपण इंग्रजीतूनच वापरतो. त्यामुळे पटकन त्यांच्या जागीत मराठी शब्द सुचत नाही; पण जिथे जिथे माझी गाडी अडली तिथे तिथे प्रभाकर माझ्या मदतीला धावून आला व त्याने मला समर्पक शब्द सांगितले. अनेक लोक, पुरुष विशेषत: मराठी व इंग्रजी भाषांतील राजकीय लेखांची पुन्हा पुन्हा उजळणी करतात कीस पाडतात त्यांचा अगदी. त्यांच्या लेखी एकही वृत्तपत्र दुपारी अखेरचा श्वास घेत नाही. हे लोक वृत्तपत्राचे साठे जमवून ठेवतात व पुन्हा पुन्हा वाचतात. प्रभाकर या पठडीतला वाचक. विचारवंत असल्यामुळे त्याच्या मनात मराठी-इंग्रजी राजकीय विषयांचा एक शब्दकोश- तो मूळचा कोकणी भाषिक असूनही तयार झाला होता. तो 'मोदीज् वर्ल्ड'साठी कामी आला व या निमित्ताने त्याचा एक नवीन गुण माझ्या

लक्षात आला. भाषांतराच्या फाईल्स त्याने समग्र वाचल्या व त्यातील शुद्धलेखनाच्या तथा आशयाच्या चुकाही त्याने मला शोधून दिल्या. सहलेखक म्हणून नाव छापण्या जोगतीच ही कामगिरी आहे; पण सहजीवी आहेच. त्यात सर्व आले.

'चिरंजीवी महर्षी व्यास' मी हाताने लिहिले. (५०० प्रिंटिंग कागद, ६ बॉलपेने) पण या भाषांतरासाठी संगणकच वापरावा लागला. कारण इंग्रजीच्या वाक्यातला पुढचा भाग मराठीत आधी येतो. त्यामुळे भाषांतर करून पुन्हा पुन्हा मागे-पुढे कट्ट-पेस्ट करायला हवे. तसेच मोहनना परिच्छेद संपल्यानंतरच पूर्णविराम देण्याची आवड आहे. त्याऐवजी परिच्छेदात दोन पाच तरी पूर्णविराम देण्याचा निर्णय मी व शितल मेहतांनी आधीच घेतला होता. असे असताना प्रस्तुत पुस्तकाचे हस्तलिखित करण्याच्या भरीस पडले असते तर खाडाखोड आभाळाएवढी झाली असती.

गंमत अशी की, मराठी भाषांतराची चटक लागल्यामुळे प्रभाकरने मूळ इंग्रजी, 'मोदीज् वर्ल्ड' वाचले नाही. सॉरी राजा मोहन! पण असे कधी कधी होते. मराठीप्रेमी वाचक इंग्लिश 'मॅडम' पेक्षा मराठी 'पोरगी'च पसंत करतो. इंग्लिश मॅडम भारदस्त असते. वाचकांवर 'रोख' टाकते. इथे तर ती मणामणाचे दागदागिने घालून व अनेक आधुनिक हत्यारे हाती घेऊन प्रकट झाली आहे. मराठी मुलगी या अवतारात शोभणार नाही. ती नाजूक असली पाहिजे. वाचकांना दिपवून टाकणे हा तिचा पिंड नाही. वाचकांना आकृष्ट करणे हा आहे. मोहन यांच्या शब्दांबाबत व आशयाबाबत तिळमात्रही स्वातंत्र्य न घेता मी मराठीचा पिंड कायम ठेवला आहे.

'चिरंजीवी महर्षी व्यास' व 'मोदीज् वर्ल्ड' ही पुस्तके मी एकाच वेळी लिहिली. 'मोदीं'ची भाषा कठीण तर 'व्यास'मधली पात्रसंख्या, विचार आणि भावनांचा विस्तार बिकट. त्यामुळे दमछाक व्हायची; पण दोघेही माझ्या मानगुटीवर बसून मला पुढे खेचीत राहिले. पुन्हा पुन्हा मी कागदांपाशी धाव घेत असे. मोदी सर्वांचेच मानगूट धरतात असे मी ऐकते; पण त्यांच्यासंबंधीच्या (त्यांच्या नव्हे) लिखाणातही हा गुण उतरला असेल याचा प्रत्यय प्रथमच आला. 'मोदीज् वर्ल्ड' भाषेच्या दृष्टीने थोडेसे कठीण आहे खरे. कारण ते एका अभ्यासू तज्ज्ञाने लिहिले

आहे. राजकारण, राजनीती, अर्थव्यवस्था ही सर्व शास्त्रे आहेत. या शुद्ध शास्त्रीय दृष्टिकोनातून ते लिहिले आहे. यासाठी मोहनची प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे आणि या कारणासाठीच प्रत्येक मराठी वाचकाने ते वाचले पाहिजे. सर्वसाधारण माणसाला राजकारण आवडत नाही. 'राजकारणातल्या माणसांविषयी सर्वसाधारणपणे मराठी माणसाच्या मनात फारशा सद्भावना नसतात. सत्ता मिळवण्यासाठी माणसे वाटेल ते करतात आणि सत्ता हासील केल्यानंतर आणखीनच वाटेल ते करतात' अशी स्थूलमानाने मराठी माणसांची राजकारणाबद्दल मीमांसा आहे. राजकारण, राजनीती, आंतरराष्ट्रीय संबंध, परदेशाविषयक धोरण वगैरे विषयांची आता शास्त्रे आहेत यांचे ज्ञान फारच थोड्यांना आहे. त्यांनाही ही शास्त्रे नेमकी काय आहेत याचा थांगपत्ता नाही; पण ही शास्त्रे तयार झालेली आहेत. काटेकोर आहेत. विज्ञानाचे सिद्धांत अतूट असतात, तितकेच या राष्ट्रांचे सिद्धांतही अतूट आहेत. या शास्त्रांचा अभ्यास करणारे आणि त्यात परमोच्च पदवी मिळवणारे अनेक आहेत. पैकी एक राजा मोहन. हे त्यांचे महत्त्व झालेच झाले. अशा काही अभ्यासू पंडितांच्या पुस्तकांचा परामर्श त्यांनी 'मोदींचे जग'मध्ये घेतला आहे तो अचाट आहे. 'पाकिस्तानचा भौगोलिक-राजकीय शाप' असे न ऐकलेले सिद्धांत यात आहेत.

'मोदीज् वर्ल्ड' वाचकांना राजकीय व्यक्तींचे मुल्यांकन करण्याचा मापदंड देते. या व्यक्तींच्या मूल्यांकनाचे मोजमाप आपल्याला करता येत नाही. यांच्याबद्दल उलट सुलट बातम्या छापून येतात. मग उडून जातात. विरोधक टीका करतात आणि हे स्वत: समर्थन व आत्मस्तुती करतात. यामुळे वाचकांच्या मनात गोंधळच गोंधळ माजतो. काही विषयांपुरता राजा मोहनने हा गोंधळ निवारला आहे; पण त्याचबरोबर इतर अनेक घटनांचे व व्यक्तींचे मूल्यांकन करण्यासाठी एक सुडौल व निश्चित मापदंड आपल्या हाती दिला आहे. याबद्दल मोहनना शतदा थँक्स.

आमचे व्याही श्री. प्रभाकर नाडकर्णी व त्यांची पत्नी कै. मालिनी यांना हे पुस्तक मी अर्पण केले आहे. ही दोघे आमचे व्याही-विहीण आहेत. त्यापेक्षाही स्नेही जास्त आहेत. गेली कित्येक वर्षे आम्ही चौघे ब्रिज खेळत आलो. मालिनीच्या दु:खद निधनामुळे यात खंड पडला. तिच्या व माझ्या भरपूर गप्पा-

टप्पा होत असत. विशेषत: बदलत्या समाजावर मतं प्रदर्शित करण्याची आम्हाला खूप आवड होती. नाडकर्णींनी स्टॅटिस्टिक्समध्ये एम.एस्सी. केली. मुंबईच्या कॉलेजातून प्राध्यापन केले व नंतर युनेस्कोसाठी विविध देशातही प्राध्यापन केले; परंतु पुस्तक त्यांना अर्पण करण्याचा प्रमुख उद्देश असा की त्यांनाही राजकीय लेख वाचण्याची और हौस आहे. वृत्तपत्रे साठवीत असतात व रात्र रात्र जागून वाचीत असतात. प्रस्तुत पुस्तकासाठी ते वाचक नं. एक आहेत. अर्थात पुस्तकावर त्यांचाच अधिकार आहे.

**– इंद्रायणी सावकार**

## प्रस्तावना

पंतप्रधान नरेंद्र दामोरदास मोदी यांच्या भारताच्या परदेशविषयक धोरणाच्या तरुणीकरण करण्याच्या उत्साहाने देशाला तथा समस्त जगाला चकित करून सोडले आहे. मोदींनी दहा वर्षांपेक्षा अधिक काळ गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून काम केले. अशा प्रकारचा राज्यस्तरीय नेता भारताच्या राजनीतीमध्ये लक्षणीय बदल घडवून आणेल ही अपेक्षा नसल्यातच जमा होती. २००२ साली गुजरातमध्ये दंगे झाले त्यात मोदींनी भूमिका बजावली होती, अशी अढी मनाशी धरून अमेरिका व युरोप यांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला होता. याचा ध्वनित अर्थ असा होत होता की, राजकीयदृष्ट्या एका गंभीर त्रुटीपासून जागतिक आघाडीवर पंतप्रधान या नात्याने मोदींच्या प्रवासाचा आरंभ होईल. २०१४ च्या लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचार-मोहिमेच्या काळात भारताच्या परदेशविषयक धोरणाबद्दल त्यांचा जागतिक दृष्टिकोन किंवा योजना नेमकी काय आहे, याचा खुलासा करण्यासाठी पुरेशी चालना त्यांच्यापाशी नव्हती. एक अनपेक्षित खेळी खेळून भाजपाने त्यांच्या ध्येय-धोरणाच्या प्रकाशित कार्यक्रमात पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून मोदींचा पुरस्कार केला होता. या कार्यक्रमातही मोदीप्रणीत संभाव्य सरकारच्या परदेशविषयक धोरणात कोणकोणत्या बाबींना अग्रक्रम देण्यात येईल, याचे फारसे उल्लेख नव्हते.

तरीही कालावधीच्या प्रारंभीच्या काही दिवसांतच मोदींनी भारताच्या परदेशविषयक धोरणाच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीला नूतन गतिमानता पुरवली. गेल्या तीस वर्षांतले निर्विवाद बहुमतावर आधारलेले मोदी सरकार हे पहिले सरकार. अशा असाधारण सरकारचा नेता या नात्याने मोदींना स्वगृही भरघोस राजकीय अधिकार मिळालेला होता. त्याचबरोबर परदेशातही त्यांनी भरपूर कुतूहल निर्माण केले. मिळालेल्या अभूतपूर्व सार्वमताचा पूर्णत: फायदा उठवून मोदींनी

अमेरिकेच्या थिजलेल्या स्नेहसंबंधांत ऊब आणली. चीन व पाकिस्तान यांच्याविषयीच्या भूमिकांत फेरबदल केला. रशियाशी पूर्वापारपासून स्नेहसंबंध आहेत, ते जपले. जपान व ऑस्ट्रेलियाशी आपली धोरणात्मक भागीदारी आहे, तिथे अधिक जवळीक साधली. शेजारी राष्ट्रांविषयीचे भारताचे धोरण विशेष भक्कम केले आणि परदेशस्थ भारतीयांशी पुन:श्च नवीन नातेसंबंध जोडले. यूपीए सरकारच्या दुसऱ्या कालावधीत (२००९ ते २०१४) जागतिक पटावर भारताची कथा पुसट होत चालली होती, ती पुन:श्च अधोरेखित करीत असतानाच मोदींनी भारतीय राजनीतीत आश्चर्यकारक व्यक्तिगत ऊर्जा संचारवली. असे विलोभनीय दृश्य राजीव गांधींच्या काळानंतर पुन्हा कधीही दिसले नव्हते. पूर्वतयारीविना भाषण, जनतेशी संपर्क साधताना हिंदीचा प्रयोग, शब्दकोशात नवीन शब्दांची भर आणि स्वतःच्या धार्मिकतेचे जनतेमध्ये दिलखुलास प्रकटन ही त्यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्येही लक्षात घेता त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या एकूण एक सर्व पंतप्रधानांपेक्षा ते कितीतरी आगळेवेगळे आहेत हे ध्यानात येते. गुजरातमध्ये त्यांनी व्यवहारवादाची कास धरली. या नीतीची छाप त्यांनी भारताच्या राजनीतीवरही बसवली. कदाचित भारताच्या परदेशविषयक धोरणाला त्यांची ही सर्वांत महत्त्वाची भेट ठरावी. तर्कशास्त्राचे निकष वापरून मोदींच्या निर्धाराची रूपरेषा जर अंतापर्यंत पुढे खेचली तर खालीलप्रमाणे दृश्य आपल्या डोळ्यांसमोर तरळेल. भारताच्या आर्थिक प्रगतीपुरती तरी राजनीतीने दासीची भूमिका बजावावी, या मोदींच्या निर्धारामुळे भारताला सर्वंकष आंतर्देशीय ताकद एकत्रित करता येईल. हिंद पॅसिफिक प्रदेशांवर भारताचा जो पारंपरिक परिणाम होत असतो, त्याची व्याप्ती विस्तारता येईल आणि सरकारच्या दुसऱ्या कालावधीत भारताची भौगोलिक व राजकीय गतिमानता हरपली ती पुन:श्च स्थानापन्न करता येईल.

प्रस्तुत पुस्तक २०१५ सालाच्या पूर्व भागापर्यंत मोदींचे बाह्य जगाबरोबर जे संबंध राहिले, त्यांचे जवळून निरीक्षण करते. त्यांच्या कालावधीच्या पुऱ्या एका वर्षाच्याही काळाचा मी परामर्श घेतलेला नाही, तरीही त्यांच्या परदेशविषयक धोरणांचे अनौपचारिक मूल्यांकन करण्याइतका पुरावा जमा झालेला आहे. 'मोदीज वर्ल्ड'ने भारताच्या निश्चयित क्रांतीचे चित्रण केले आहे. या क्रांतीचे स्वरूप असे : हा देश आत्मशंका व स्वतःची विरोधग्रस्त जागतिक भूमिका यांच्या दलदलीत